जा/सा नि/नि

**महाराष्ट्र नागरी सेवा नियम-**
**अधिकारांचे प्रत्यायोजन**

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक: सेनिये १००१/१३०/सेवा-४
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. दिनांक: २ जून, २००३

## निर्णय

शासनाच्या गतिमान व प्रभावी प्रशासन या धोरणास अनुसरुन महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमधील काही अधिकारांचे प्रत्यायोजन करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता खालील महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमधील कांही अधिकार, या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-१** मध्ये नमूद केल्याप्रमाणे, प्रत्यायोजित करण्याचा निर्णय घेतला आहे:-

१) महाराष्ट्र नागरी सेवा ( सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम, १९८१,

२) महाराष्ट्र नागरी सेवा ( रजा ) नियम, १९८१,

३) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१,

४) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२.

२. शासनाने खालील बाबीसंबंधातील अधिकारही या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-२** मध्ये नमूद केल्याप्रमाणे, प्रत्यायोजित करण्याचा निर्णय घेतला आहे:-

१) भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांना सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमधून परतावा व ना-परतावा अग्रिम मंजूर करणे,

२) मंत्री आस्थापनेवर नियुक्त करावयाच्या शासकीय तसेच अन्य कर्मचाऱ्यांच्या अटी व शर्ती,

३) भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची स्वीयेतर सेवेतील प्रतिनियुक्ती.

३. शासनाने असाही निर्णय घेतला आहे की, हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील व या दिनांकाला प्रलंबित असलेली प्रकरणेही या आदेशानुसार विनियमीत करण्यात येतील. मात्र, जी प्रकरणे यापूर्वीच अंतिमत: निकालात काढलेली आहेत त्या प्रकरणांचे पुनर्विलोकन करण्यात येणार नाही.

४. शासन असेही निदेश देत आहे की, या शासन निर्णयाच्या परिशिष्टात दर्शविण्यात आलेल्या अधिकारांपेक्षा अधिक प्रमाणातील अधिकार जर यापूर्वीच प्रदान करण्यात आलेले असतील तर ते अधिकार यापुढेही चालू राहतील.

५. वर नमूद केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा नियमांमधील विद्यमान तरतूदी, या शासन निर्णयातील तरतूदींच्या मर्यादेपर्यन्त सुधारण्यात आल्या आहेत असे मानण्यात येईल. या नियमात रितसर सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

६. वर नमूद केलेली <u>परिशिष्ट-१</u> व <u>परिशिष्ट-२</u> या शासन निर्णयासोबत जोडपत्र म्हणून जोडली आहेत.

७. हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने (अनौ.संदर्भ क्र.६/२००३/२८, दि.१२.२.२००३) निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ.कु.वी. जाधव**
**शासनाचे प्रधान सचिव.**

प्रति,

◆भारत सरकारचे सचिव,वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,
◆महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),
◆महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
◆महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
◆महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
◆मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
◆नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
◆ संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
◆अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (२५ प्रती),
◆मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
◆उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
◆वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
◆निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
◆ सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
◆राज्यपालांचे सचिव,
◆मुख्य मंत्र्यांचे सचिव,
◆उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
◆ सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
◆*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
◆*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
◆*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
◆*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
◆*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
◆*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
◆मंत्रालयातील सर्व विभाग,
◆विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
◆मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
◆ सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
◆ सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
◆ सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
◆ सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी १५ प्रती),
◆शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
◆ तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
◆ संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
◆ सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
◆ सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
◆शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
◆ सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
◆ सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
◆ सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
◆कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
◆कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
◆कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
◆कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
◆ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
◆शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
◆उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
◆कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
◆वित्त विभागातील सर्व कार्यासने,
◆<u>निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.</u>

*पत्राद्वारे

१६४ 285



[शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: सेनिवे-१००१/१३०/सेवा-४, दिनांक २ जून २००३ चे जोडपत्र]

# परिशिष्ट - एक

## महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१

### प्रत्यायोजित केलेले अधिकार

| अ. क्र. | नियम क्रमांक | अधिकारांचे स्वरुप | अधिकार प्रत्यायोजित केलेला प्राधिकारी | व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ९ (१४) (एफ) | सक्तीच्या प्रतीक्षेचा पूर्ण कालावधी "कर्तव्य" म्हणून नियमित करण्याचा अधिकार. | नियुक्ती प्राधिकारी. | पूर्ण अधिकार. | या बाबतच्या शर्ती पुढीलप्रमाणे:- १) पद स्थापनेस लागणारा विलंब हा प्रशासकीय कारणास्तव असला पाहिजे व तसे नियुक्ती प्राधिकाऱ्याने प्रमाणित केले पाहिजे. तसेच विलंबाची कारणे आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात आली पाहिजेत. २) प्रशासकीय कारणाव्यतिरिक्त अन्य कारणास्तव पद स्थापनेस १५ दिवसांपेक्षा जास्त विलंब झाल्यास विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांकडून सक्तीच्या प्रतीक्षेच्या कालावधीच्या वेतन व भत्त्याची रक्कम वसूल करण्यात यावी. |
| २ | ३८(२) (एफ) | शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकामध्ये सुरुवातीला नोंद केलेल्या जन्मतारखेत, सेवेत प्रवेश केल्यापासून ५ वर्षांच्या आत दुरूस्ती करण्याचे अधिकार. | १) अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी- विभाग प्रमुख | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/तरतूदींच्या अधीन राहून. |
| | | | २) राजपत्रित अधिकाऱ्यांच्या प्रकरणी- मंत्रालयीन प्रशासकीय विभाग. मात्र, सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करणे आवश्यक. | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/तरतूदींच्या अधीन राहून. |

परिशिष्ट-एक (पुढे चालू....)

## महाराष्ट्र नागरी सेवा(रजा) नियम, १९८१

### प्रत्यायोजित केलेले अधिकार

| अ.क्र. | नियम क्रमांक | अधिकारांचे स्वरुप | अधिकार प्रत्यायोजित केलेला प्राधिकारी | व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ३ | ६३ (६) | रजेशिवाय अनुपस्थित राहिल्याचा पूर्ण कालावधी भूतलक्षी प्रभावाने असाधारण रजेमध्ये परिवर्तित करण्याचा अधिकार. | नियुक्ती प्राधिकारी. | पूर्ण अधिकार. | अस्थायी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत- नव्वद दिवसांपर्यन्त आणि<br>स्थायी कर्मचाऱ्यांच्याबाबतीत - एका वर्षापर्यन्त<br>मात्र, वरील मर्यादेच्या पलिकडील रजा खालील अटींच्या अधीन राहून मंजूर केली जाईल :-<br>(१) रजेशिवाय अनुपस्थित राहील्याच्या कालावधीपूर्वी किमान ५ वर्षे इतकी संतत सेवा झालेली असावी.<br>(२) जो कर्मचारी रजेशिवाय अनुपस्थित राहिला असेल व त्याने वेळोवेळी अर्जाद्वारे याबाबतची माहिती कार्यालयास दिलेली असेल तर अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याच्या मते त्याची अनुपस्थिती समर्थनीय असेल तर रजेशिवाय अनुपस्थितीचा कालावधी देय व अनुज्ञेय रजा मंजूर करुन नियमित करण्याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्याने निर्णय घेणे आवश्यक असेल. जर कर्मचाऱ्याची अनुपस्थिती समर्थनीय नसेल तर त्याच्याविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करण्यात यावी.<br>(३) शिस्तभंगविषयक कार्यवाहीअंती जे कर्मचारी समर्थनीय नसलेल्या कारणास्तव रजेशिवाय अनुपस्थित असतील अशांच्या बाबतीत त्यांची संपूर्ण अनुपस्थिती "अकार्यदिन" (Dies-non) म्हणून समजण्याच्या दृष्टीकोनातून निर्णय घेण्यात यावा.<br>(४) रजेशिवाय अनुपस्थित राहील्याचा कालावधी असाधारण रजेमध्ये परिवर्तीत करण्याचा/ अकार्यदिन म्हणून समजण्याचा निर्णय घेण्यात आल्यास तो कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनार्थ (निवृत्तिवेतनविषयक लाभांसह) ग्राह्य धरण्यात येऊ नये व तशी स्पष्ट नोंद सेवा पुस्तकात घेण्यात यावी.<br>(५) रजेशिवाय अनुपस्थित राहील्याच्या कारणास्तव विभागीय/न्यायिक चौकशी प्रलंबित नसावी.<br>(६) रजेशिवाय अनुपस्थित राहिल्याच्या कारणास्तव संबंधित कर्मचाऱ्यास सक्तीने सेवानिवृत्त/सेवेतून काढून टाकलेले किंवा बडतर्फ केलेले नाही अथवा त्याने राजीनामा दिलेला नाही याची सक्षम |

| अ.क्र. | नियम क्रमांक | अधिकारांचे स्वरूप | अधिकार प्रत्यायोजित केलेला प्राधिकारी | व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | प्राधिकाऱ्याने खात्री करुन तसे प्रमाणित करणे आवश्यक राहिल.<br>(७) रजेशिवाय अनुपस्थित राहिल्याबद्दल संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द वेळीच शिस्तभंगाची कार्यवाही न केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यावर या संबंधातील जबाबदारी निश्चित करण्यात यावी. |
| ४ | ७९ व परिशिष्ट तीन मधील नियम ८(४) | तिसऱ्या वेळची क्षयरोग/ कर्करोग/ कुष्ठ रोग व पक्षाघात रजा मंजूर करण्याबाबत | मंत्रालयीन प्रशासकीय विभाग. | पूर्ण अधिकार. | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या परिशिष्ट-तीन मध्ये विहीत केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून. |
| ५ | ८० | भारतात/ भारताबाहेर अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरिता अध्ययन रजा | १) भारतात अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरिता- मंत्रालयीन प्रशासकीय विभाग<br>२) भारताबाहेर अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरिता- मंत्रालयीन प्रशासकीय विभाग. मात्र सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करणे आवश्यक | पूर्ण अधिकार.<br>पूर्ण अधिकार. | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या प्रकरण-सात मध्ये विहीत केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून.<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या प्रकरण-सात मध्ये विहीत केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून. |

परिशिष्ट-एक (पुढे चालू....)

## महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१

### प्रत्यायोजित केलेले अधिकार

| अ.क्र. | नियम क्रमांक | अधिकारांचे स्वरुप | अधिकार प्रत्यायोजित केलेला प्राधिकारी | व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ६ | ४० व परिशिष्ट-३ सूचना क्र.१ | स्वीयेतर सेवेतील प्रतिनियुक्तीचा कालावधी ४ वर्षांच्या पुढे वाढविणे. | मंत्रालयीन प्रशासकीय विभाग. मात्र, संबंधित खात्याचे प्रभारी मंत्री व मुख्यमंत्री यांची स्पष्ट मान्यता आवश्यक. | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/ तरतूदींच्या अधीन राहून. |
| ७ | ४० व परिशिष्ट-३ सूचना क्र.१ | स्वीयेतर सेवेतून मूळ विभागात परत आल्यावर ४ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी पुन्हा स्वीयेतर सेवेत प्रतिनियुक्ती देण्याबाबत. | मंत्रालयीन प्रशासकीय विभाग. मात्र संबंधित खात्याचे प्रभारी मंत्री व मुख्यमंत्री यांची स्पष्ट मान्यता आवश्यक. | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/ तरतूदींच्या अधीन राहून |
| ८ | ७३ | नियम ७०, ७१ व ७२ नुसार वेतन/भत्याचे प्रदान व कालावधी नियमित करणेबाबत. | नियम ७०, ७१ व ७२ नुसार वेतन/भत्ते व कालावधी नियमित करण्याचे आदेश काढण्यास सक्षम असलेला प्राधिकारी. | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/ तरतूदींच्या अधीन राहून. नियम ७३ वगळण्यात आला आहे असे समजण्यात यावे. |

परिशिष्ट-एक (पुढे चालू....)

## महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२

### प्रत्यायोजित केलेले अधिकार

| अ.क्र. | नियम क्रमांक | अधिकारांचे स्वरुप | अधिकार प्रत्यायोजित केलेला प्राधिकारी | व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ९ | १०(५), ६५ व ६६ | स्वेच्छा निवृत्तीच्या तीन महिन्यांच्या नोटीशीचा कालावधी कमी करणे. | नियुक्ती प्राधिकारी. | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/तरतूदींच्या अधीन राहून. |
| १० | २७ | सेवानिवृत्तीनंतर विभागीय चौकशी सुरु करणे व निवृत्तिवेतनात कपात करणे. | नियुक्ती प्राधिकारी. | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/तरतूदींच्या अधीन राहून. |
| ११ | ४० | मान्य युद्ध सेवा/ सैनिकी सेवा व नागरी सेवा यांमधील खंड क्षमापित करणे. | नियुक्ती प्राधिकारी. | पूर्ण अधिकार. | नियम ४० व ४१ मधील अटींच्या अधीन राहून संपूर्ण अधिकार. मात्र प्रत्यक्ष खंडाचा कालावधी अर्हताकारी सेवा म्हणून समजण्यात येऊ नये. |
| १२ | ४६ | राजीनामा दिलेल्या व्यक्तीची पुन्हा सेवेत घेण्याची विनंती. | मंत्रालयीन प्रशासकीय विभाग. मात्र सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करणे आवश्यक. | पूर्ण अधिकार. | बाबतच्या शर्ती पुढीलप्रमाणे :- (१) मात्र नियमातील इतर अटींची पूर्तता होणे आवश्यक असेल. (२) त्याचप्रमाणे राजीनामा दिल्याच्या दिनांकापासून सेवेत पुन्हा घेतल्याच्या दिनांक पर्यंतचा कालावधी असाधारण रजा म्हणून नियमित करावा लागेल व तो कालावधी कोणत्याही प्रयोजनार्थ "कर्तव्य कालावधी" म्हणून ग्राह्य धरता येणार नाही. |
| १३ | ६७ व शा.नि. वि.वि.क्र. PEN 1080/ CR 210/ SER-4 दि.28.4.1981 | सरकारी क्षेत्र उपक्रमात शासकीय सेवकांना सामावून घेण्याच्या बाबी. | नियुक्ती प्राधिकारी. | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/तरतूदींच्या अधीन राहून. |
| १४ | १०१ (शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र. सेनिवे १०९१/१७७/ सेवा-४, दि. ७ डिसेंबर १९९४. | सेवेतून काढून टाकलेल्या कर्मचाऱ्यास जर खास विचार करण्यायोग्य प्रकरण असेल तर अनुकंपा निवृत्ति वेतन मंजूर करणे. | संबंधित कर्मचाऱ्यास सेवेतून काढून टाकण्याची शिक्षा देण्यास सक्षम असलेला अधिकारी. | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/तरतूदींच्या अधीन राहून. |

[शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: सेनिवे-१००१/१३०/सेवा-४, दिनांक २ जून २००३ चे जोडपत्र]

# परिशिष्ट - दोन

## प्रत्यायोजित केलेले अधिकार

| अ. क्र. | नियम क्रमांक | अधिकारांचे स्वरूप | प्रत्यायोजित करण्यात येणारे अधिकार | व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १५ | शासन निर्णय, सा.प्र.वि. क्रमांक: एमआयएन १०९०/प्र.क्र.१३/९०/ का-२१,दिनांक १७.३.९० | मंत्री आस्थापनेवर, शासकीय तसेच अन्य कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती विहित करणे. | मंत्रालयीन प्रशासकीय विभाग. मात्र सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करणे आवश्यक. | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/तरतूदींच्या अधीन राहून. |
| १६ | शासन परिपत्रक सा.प्र.वि. क्र.भाप्रसे ३०९५/३००/९५/मक, दिनांक १८/४/१९९६ | भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची स्वीयेतर सेवेतील नियुक्ती. | मंत्रालयीन प्रशासकीय विभाग. मात्र सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करणे आवश्यक. | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/तरतूदींच्या अधीन राहून. |
| १७ | All India Services (Provident Fund) Rules 1955 | भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांना सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी मधून परताव्या व ना-परताव्या अग्रिम मंजूर करण्याबाबत. | सामान्य प्रशासन विभाग. | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/तरतूदींच्या अधीन राहून. |
| १८ | शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. सीबीई १८९३/प्र.क्र. ३८/९३/ तेरा, दिनांक १५.२.१९९५ | सेवानिवृत्तीनंतर शासकीय अधिकारी/ कर्मचारी व विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती यांना करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत. | मंत्रालयीन प्रशासकीय विभाग. मात्र, सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करुन मुख्य सचिवांमार्फत मुख्यमंत्री यांची स्पष्ट मान्यता प्राप्त करणे आवश्यक. | पूर्ण अधिकार. | नियमांमधील तरतूदी तसेच शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांमधील अटींच्या/तरतूदींच्या अधीन राहून . |